## नियमीत फौजदारी खटला क्र. १५/२०२१ मध्ये

## निशाणी क्र. ५२ वरील आदेश

सरकारी वकिलांनी प्रस्तूतचा अर्ज फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३११ प्रमाणे दाखल केलेला आहे.

२. सरकार पक्षाच्या कथनानुसार, प्रकरणात सर्व साक्षीदार तपासलेले आहेत. परंतु तपासीक अधिकारी दिगंबर तलमले यांच्याकडून प्रकरणात नक्की काय जप्त केले व कशाने मार लागलेला होता, काठीने, लोखंडाच्या सळईने की पेचकसने हा पेच सोडवणे जरुरीचे आहे, कारण दाखल अधिकारी यांनी तक्रारकर्त्याच्या तक्रारीप्रमाणे स्पष्टीकरण दिलेले आहे. परंतु प्रकरणाचा गुंता अजुनही स्पष्ट झालेला नाही. याकरिता तपासीक अधिकारी दिगंबर तलमले यांना पुन्हा एकदा साक्षसमंस काढून साक्ष नोंदविणे जरुरीचे आहे. याकरिता कलम ३११ प्रमाणे साक्षीदाराला पाचारण करण्याकरिता साक्षसमंस काढण्याची विनंती त्यांनी केलेली आहे.

३. आरोपी यांनी अर्जास हरकत घेऊन कथन केले की, साक्षीदार नि.क्र.३९ प्रमाणे तपासण्यात आलेला आहे. त्याने त्याच्या जबानीमध्ये पेचकस हा जप्त केल्याचे मान्य केले आहे. त्यामुळे त्यांना पुन्हा तपासण्याची आवश्यकता नाही.

४. सदर प्रकरणातील पुरावे पाहता सरकार पक्षाने ०७ साक्षीदार तपासल्यानंतर प्रस्तूतचा अर्ज दिलेला आहे. तपासीक अंमलदार यांना नि.क्र.३९ प्रमाणे तपासले असता त्यांच्या तोंडी पुराव्यात त्यांनी जप्ती पत्रकाप्रमाणे पेचकस पंचांसमक्ष जप्त केला असे कथन करून नि.क्र.४२ प्रमाणे ते जप्तीपत्रक असल्याचेही कथन केले. तसेच त्यांना आर्टीकल–अ वरील पेचकस दाखविला असता तो त्यांनी ओळखला. फिर्यादी यांनी नि.क्र.२७ प्रमाणे साक्षमध्ये त्याला पेचकसने मारले असे कथन केले असून ते पेचकस आर्टीकल–अ आहे असेही कथन केले आहे. सदर प्रकरणात गुन्हा नोंद करणारे साक्षीदार क्र.७ यांनादेखील नि.क्र.५० प्रमाणे तपासले आहे व त्यांनी काठी व सळाखी याबाबत कथन केलेले आहे. हा सर्व पुरावा अभिलेखावरती आहे. त्यामुळे अशा परिस्थितीत पुन्हा तपासीक अंमलदार यांना साक्षसमंस काढल्यास त्यांना शिकवुन नविन बाब न्यायालयासमोर येण्याची शक्यता नाकारता येणार नाही. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३११ हे या प्रकरणात वरील परिस्थितीमध्ये लागु पडणार नाही. साक्षीदारांचे पुरावे हे त्यांच्या कथनाप्रमाणे असून त्यांनी

पेचकसने मारल्याबाबत, ते जप्त केल्याबाबत, पेचकस दाखविल्यावर तेच असल्याचे कथन केल्यामुळे आणि आरोपी यांनी त्यांचा उलटतपास घेऊन त्यांचा बचाव हा समोर आणलेला असल्यामुळे प्रस्तूतचा अर्ज याक्षणी मंजुर करणे न्यायोचित होणार नाही. त्यामुळे खालील आदेश–

**आदेश**

अर्ज नामंजुर करण्यात येत आहे.

स्वा/–

दि. २१/१२/२०२३

(रा. सु. धडके)

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, लाखनी.